वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. २४ सप्टेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# धनंजय मुंडेंना पुन्हा मंत्री करणार?

## अजित पवार व सुनील तटकरे म्हणाले योग्य वेळी निर्णय

बीड, (दिव्य न्युज):- बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) आमदार धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड याला अटक करण्यात आली आहे. तसेच वाल्मिकबरोबरच्या संबंधांमुळे धनंजय मुंडे यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. दरम्यान, आता धनंजय मुंडे यांना पुन्हा एकदा मंत्रिपदाचे वेध लागल्याचं बोललं जात आहे. कारण कर्जतमधील एका कार्यक्रमात मुंडे यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासमोरच मोठी मागणी केली आहे. धनंजय मुंडे म्हणाले, मला रिकामं ठेवू नका. एखादी जबाबदारी द्या. धनंजय मुंडे यांच्या या मागणीवर आता सुनील तटकरे यांनी सूचक प्रतिक्रिया दिली आहे.

सुनील तटकरे म्हणाले, ते (धनंजय मुंडे) मला म्हणालेत की काम द्या. याचे वेगवेगळे अर्थ आहेत. वेगवेगळे अर्थ घेता येतील. त्यासंदर्भात योग्य वेळी निर्णय घेतला जाईल. कारण त्यांनी राजीनामा दिला त्याची काही कारणं आहेत. न्यायालयीन प्रक्रिया व चौकशी चालू आहे. त्यासंदर्भात आमचे पक्षश्रेष्ठी, महायुतीचे प्रमुख नेते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमच्या पक्षाचे प्रमुख अजित पवार एकत्र बसून निर्णय घेतील.



## माझा हात रिकामी, काहीतरी काम द्या

### धनंजय मुंडेंची भर सभेत मागणी

राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे नेते आणि खासदार सुनील तटकरे यांचा रायगडमध्ये जाहीर सत्कार सोहळा पार पडला. या जाहीर सत्कार सोहळ्यात राज्याचे धनंजय मुंडे यांनी त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. राजकीय प्रवासात वडील नसताना सुनील तटकरे यांनी मला मोठा आधार दिला. राजकारणात माझे वडील नाहीत, पण त्यांच्या जागेवर मला सुनील तटकरे यांचा आधार मिळाला. त्यांनी अनेक वर्षांपासून देशातील आणि राज्यातील अनेक दिग्गज नेत्यांसोबत घनिष्ठ संबंध जपले आहेत. महाराष्ट्राच्या मातीत नेमकं काय चाललं आहे, याची त्यांना अचूक जाण आहे. त्यामुळेच त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे.आपल्या भाषणाच्या अखेरीस धनंजय मुंडे यांनी सुनील तटकरे यांच्याकडे एक भावनिक विनंती केली. मी आज जे काही आहे, ते सुनील तटकरे यांच्यामुळेच आहे. माझ्या हाताला आता काहीतरी काम द्या. कायम आम्हाला मार्गदर्शन करत राहा. आम्ही चुकलो तर कान धरा, पण आता आम्हाला रिकामं ठेवू नका. आम्हाला जबाबदारी द्या, असे धनंजय मुंडे म्हणाले.

# मुख्यमंत्री-दोन्ही उपमुख्यमंत्री अन् मंत्रिमंडळ शेतकऱ्यांच्या बांधावर



Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

मुंबई , (दिव्य न्युज):- मराठवाड्यात आलेल्या महापुराच्या परिस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झालं असून अनेकांना स्थलांतर करावं लागलं आहे. या महापुरात शेती पिकं जमीनदोस्त झाली असून अनेक जनावरंही दगावली आहेत. यामध्ये आतापर्यंत ८ जणांचा जीव गेला असून अनेक ठिकाणी बचाव पथकाचं कार्य अद्याप सुरू आहे. मराठवाड्यात अतिवृष्टी झालेल्या ठिकाणांची पाहणी आता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह सर्वच मंत्री करणार आहेत. तसेच त्या त्या जिल्ह्यांचे पालकमंत्रीही दौऱ्यावर असणार आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस बुधवारी सोलापूर आणि लातूर जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवारही सोलापूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे धाराशिव जिल्ह्यातील पूरस्थितीचा आढावा घेणार आहेत. पालकमंत्री त्या त्या जिल्ह्यांच्या दौऱ्यावर जाणार असून पूरस्थितीची पाहणी करणार आहेत.मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत आतापर्यंत जवळजवळ २३ टक्के शेतीचं नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. ▸▸ पान २ वर

## आम्ही पाहणीपूर्वीच २२०० कोटी रिलीज केले; विरोधकांनी कधीही भरपाई दिली नाही

### बांधावरुन देवाभाऊंचा बळीराजाला धीर

लातूर : विरोधकांनी कधीही भरपाई दिली नाही, हे पहिले सरकार आहे ज्यांनी पाहणीपूर्वीच २२०० कोटी रुपये शेतकऱ्यांच्या मदतीसाठी रिलीज केले आहेत, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या ▸▸ पान २ वर





## बॅगवरचा फोटो कसला पाहता, मदत पाहा

### एकनाथ शिंदे शेतकऱ्यांच्या बांधावर

उस्मानाबाद : अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मंगळवारच्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यात आला. राज्य सरकारने आतापर्यंत ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना २ हजार २१५ कोटी रुपयांची ▸▸ पान २ वर



## अरे... माणसा....

# काय होतास तु... काय झालास रे...



बीड : ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रकरणातील चेअरमन सुरेश कुटे आणि अर्चना कुटेयांचे फोटो पाहून त्यांची काय अवस्था झाली पहा. आतापर्यंत ऐशोआराम, आलिशान गाड्या, मागेपुढे नौकर चाकर असा तामझाम घेऊन फिरणाऱ्या अर्चना कुटे वकिलांसमोर हात जोडून उभ्या आहेत. तर चेअरमन सुरेश कुटेचे हाल पाहून ओळखणे सुद्धा अवघड झाले आहे. गोरगरीब ठेवीदारांच्या तोंडातला घास हिरावून घेत त्यांच्याच पैशावर मौज मजा करणाऱ्यांना नियती कधीच माफ करत नाही. त्यांनी जे पाप केलंय ते इथेच फेडायची वेळ आल्याचे हे बोलके छायाचित्र सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## लक्ष्मण हाकेंची 'ढाल' बनलेल्या कार्यकर्त्यावर प्राणघातक हल्ला

# ४० जणांकडून लाठ्या-काठ्यांनी मारहाण

बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांच्या सहकाऱ्यावर सावरगाव परिसरात प्राणघातक हल्ला झाला आहे. अज्ञात हल्लेखोरांनी केलेल्या मारहाणीत करवर हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्या इतर साथीदारांनाही दुखापत झाली आहे. या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला असून पोलिसांनी गुन्हा दाखल करत तपास सुरू केला आहे.आरक्षण प्रश्नावरून मराठवाड्यातील वातावरण ढवळून निघालं असून काही ठिकाणी हिंसक घटना घडत आहेत. अशातच बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात खळबळ उडवणारी घटना घडली आहे. ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांचे अतिशय जवळचे व ▸▸ पान २ वर





# काँग्रेस नेत्याला साडी नेसवणारे भाजप पदाधिकारी अडचणीत!

## थेट ॲट्रोसिटी दाखल करणार, पगारेंनी जे घडलं ते सांगितलं

मुंबई , (दिव्य न्युज):- भाजप पदाधिकाऱ्यांनी कल्याण डोंबिवलीमधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रकाश उर्फ मामा पगारे यांना साडी नेसवणून सत्कार केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी आक्षेपार्ह व्हिडिओ त्यांनी व्हायरल केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला होता. मामा पगारे यांनी पत्रकार परिषदेत घेत भाजप पदाधिकाऱ्यांवर निशाणा साधत मला फसवून बोलवून हे भ्याड कृत्य केल्याचे म्हटले तसेच भाजप पदाधिकाऱ्यांनी हे करत असताना जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप देखील केला.

मामा पगारे यांनी सांगितले की, भाजप पदाधिकाऱ्यांनी आपल्यासी गैरवर्तन करत असताना जातीवाचक शब्दांचा वापर केला. जातीचा उल्लेख करत बहुजन समाजाचा अपमान केला. त्यामुळे गैरवर्तन करणाऱ्या भाजपच्या पदाधिकाऱ्यांच्या विरोधात ॲट्रोसिटी कायद्याअंतर्गत पोलिस ठाण्यात तक्रार देणार आहे .ते म्हणाले, 'मी ५० वर्षे डोंबिवलीत निष्कलंक ▸▸ पान २ वर



# छत्रपती शिवाजी महाराजांसोबत नथुराम गोडसेचा फोटो

## 'एसटी बँके'च्या अहवालावरून उफाळला नवा वाद

मुंबई , (दिव्य न्युज):- ॲड. गुणरत्न सदावर्ते यांचे वर्चस्व असलेल्या एसटी बँकेचा अर्थात, स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेचा ७२वा वार्षिक अहवालातील फोटोवरून नवीन वादाला तोंड फुटलं आहे. एसटी बँकेचा अहवाल नुकताच प्रकाशित झाला. या अहवालाच्या मुखपृष्ठावर छत्रपती शिवाजी महाराजांसोबत महात्मा गांधी यांची हत्या करणाऱ्या नथुराम गोडसे याचा फोटो लावण्यात आला आहे.

यामुळे नवीन वादाला तोंड फुटलं आहे. यापूर्वीही वार्षिक अहवालात नथुराम गोडसे याचा फोटो वापरण्यात आला होता. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमर काळे यांनी, 'हा अत्यंत घृणास्पद प्रकार आहे. हे विकृत मानसिकतेचे लक्षण आहे,' असा घणाघात केला.

महात्मा गांधी यांची हत्या करणारा नथुराम गोडसे याचे उदात्तीकरणाचा हा प्रकार आहे. ड. गुणरत्न सदावर्तेंवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत ▸▸ पान २ वर



## नायगाव घाटात कार-बस भीषण धडक

# सरपंच पुत्राचा जागीच मृत्यू, दोघे गंभीर जखमी

पाटोदा , (दिव्य न्युज):- तालुक्यातील नायगाव घाटातील वळणावर मंगळवारी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास आरएमपीएम बस आणि कारची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात थेरला (ता. पाटोदा) येथील पान २ वर



# सामाजिक सलोख्याची गरज..

.सामाजिक सलोखा ही एका निरोगी, प्रगल्भ आणि सुसंवादी समाजाची मूलभूत गरज आहे, कारण तो समाजाला एकत्र बांधतो, शांतता आणि स्थैर्य टिकवून ठेवतो, विकास साधतो आणि सामाजिक न्याय व एकतेसाठी एक मजबूत आधारस्तंभ म्हणून कार्य करतो.सामजिक सलोखा हा समाजा-समाजात सदभावना निर्माण करून एक आदर्श समाज निर्माण करतो.विविधतेने नटलेल्या आपल्या समाजात एकमेकांबद्दल आदर,प्रेम सहिष्णुता आणि बंधुत्वाची भावना टिकवुन ठेवण्यासाठी सामाजिक सलोखा अत्यावश्यक बाब आहे.

सामाजिक सलोख्याची गरज खालीलप्रमाणे आहे:

शांतता आणि स्थैर्य:- जेव्हा समाजात सलोखा असतो, तेव्हा लोकांमध्ये सलोख्याचे आणि शांततेचे वातावरण राहते. याउलट, सामाजिक ऐक्य नसेल तर संघर्ष आणि अशांतता वाढू शकते, ज्याचा परिणाम समाजाच्या प्रगतीवर होतो.

राष्ट्रीय एकात्मता:- विविध जाती, धर्म, भाषा आणि संस्कृतीच्या लोकांमध्ये एकतेची भावना निर्माण होण्यासाठी सामाजिक सलोखा आवश्यक आहे. या एकात्मतेमुळे देश एकसंध राहत

विकास आणि प्रगती:- सामाजिक सलोखा असेल, तर समाजातील सर्व घटक एकत्र येऊन विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होतात. याशिवाय, समाजात शांतता आणि सुव्यवस्था राखल्याने आर्थिक आणि सामाजिक प्रगतीला चालना मिळते.

सामाजिक न्याय आणि समानता:- सामाजिक सलोखा समाजात समानता आणि न्यायाची भावना वाढवतो. तो लोकांना एकत्र आणतो आणि कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला कमी करतो.

जातीय आणि धार्मिक सलोखा:- महाराष्ट्र हा विविध संस्कृती आणि धर्मांचे राज्य आहे.इथे जातिय सलोखा टिकवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, जेणेकरून सर्व धर्मांचे लोक प्रेम व बंधुभावाने एकत्रितपणे राहू शकतील.

मानवी बंधुभाव वाढवणे:- सामाजिक सलोखा हा माणुसकीचा संदेश देतो.तो सर्व लोकांना एकत्र आणतो आणि एकमेकांबद्दल प्रेम,आदर व सहानुभूतीची भावना सलोखा वाढवतो.

समस्यांवर मात करणे:- कोणताही समाज जेव्हा एकत्र येतो, तेव्हा तो मोठ्या समस्यांवर सहजपणे मात करू शकतो.सलोखा समाजात एकीची ताकद निर्माण करतो, ज्यामुळे एकत्रितपणे उद्भवणाऱ्या समस्यांवर तोडगा काढणे शक्य होते.

सामाजिक सलोखा राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्यच आहे आपल्या देशात अनेक जाती-धर्माचे लोक सुखाने व आनंदाने सलोख्याचे जीवन जगत आहेत. समाजातील सलोखा अबाधित ठेवणे हे प्रत्येक नागरिकांचे आद्य कर्तव्यआहे..

सामाजिक सलोखा, राखण्यासाठी उपयुक्त भुमिका जातीय सलोखा वाढवण्यासाठी काही सूचना देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासासाठी जातीय सलोखा हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. ... त्याचबरोबर सर्व जातीयवादी पक्ष आणि जातीयवादी संघटनांवर बंदी घालण्याची नितांत गरज आहे ज्याद्वारे जातीयवादाचा धोका निर्माण होणार नाही...परंपरा लक्षात घेऊन सद्य परिस्थितीत बंधुभाव व सामाजिक सौहार्द वाढवण्यासाठी व महाराष्ट्र धर्म जागवण्यासाठी सद्भावनेची गरज आहे..

दिव्य वार्ता विशेष

सामाजिक क्रांती आणि सामाजिक सलोखा प्रत्यक्ष कृतीतून घडविणारे कृतिशील राजे म्हणून लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे नाव आजही देशात घेतले जाते.दलित शोषित बहुजनांना शासन व प्रशासना तून सन्मानाचे हक्क बहाल करणारे सामाजिक सलोखा निर्माण करणारे लोकराजा म्हणून त्यांची ख्याती होती.

महाराष्ट्र हा पुरोगामी विचारांचा पुरस्कर्ता आहे पण सध्या महाराष्ट्रात समाजा समाजात द्वेषाची भावना वाढीस लागली आहे.शालेय विद्यार्थीत सुद्धा हि भावना प्रबळ होत आहे.याचा भविष्य काळात दुष्परिणाम फार मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे.राजकीय क्षेत्रातील काही या विष प्रयोगाला हातभार लावताना दिसत आहेत.स्वार्थीची पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत.हे आजच्या युवा वर्गाने पुढाकार घेऊन थोर समाजवादी नेते डॉ राममनोहर लोहिया यांचेजाती तोडो समाज जोडो.हा संदेश.महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर सामाजिक द्वेष भावना मुक्त सामाजिक समता सलोखा कायम राहिल यासाठी पुढाकार घेऊन योगदान दिल्या शिवाय अठरा पगड जाती जमातींना एकत्रित करून स्वराज्य स्थापन करणारे छत्रपती शिवाजी महाराज व सर्व संत महात्मे, महापुरुष यांच्या विचारांचा स्वप्नातील आदर्श महाराष्ट्र सक्षमपणे उभा राहिल.सामाजिक सलोखा कायम राहिल.



लेखक
डॉ राजेंद्र मुरलीधर सानप
इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड बीड
मो.नं.९४२००१९५९७

पान १ वरून

## मुख्यमंत्री-दोन्ही

विशेषतः मराठवाड्यात अतिवृष्टी, ढगफुटी, पूराने थैमान घातलंय. या आठवड्यात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. अशा स्थितीत बळीराजा आणि सर्वसामान्यांना तातडीने दिलासा देण्याची गरज असल्याचं विरोधी पक्षांचे नेते सांगत आहेत.

आपत्तीग्रस्तांना तातडीची मदत द्यावी, तसंच ओला दुष्काळ जाहीर करावा अशीही मागणी होत आहे. शेतकऱ्यांना तातडीनं हेक्टरी ५० हजारांची मदत द्यावी, अशी मागणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे खासदार रोहित पवार यांनी केली. तर त्याच पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शक्तिपीठ महामार्ग रद्द करून तो पैसा शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी वापरावा, अशी मागणी पुढे केली.विरोधकांच्या या मागण्यांवर मुख्यमंत्र्यांनी मदतीची आकडेवारी दिली. मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर पूरग्रस्तांना तातडीनं मदतीसाठी जीआर काढण्यात आल्याचं ते म्हणाले. पुढल्या आठ दिवसांत २ हजार २१५ कोटी रुपये शतकऱ्यांच्या खात्यात जमा होतील अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. तसंच सर्व मंत्र्यांना शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्याचे आदेश दिल्याचं मुख्यमंत्र्यानी सांगितलं.

आमदार-खासदार फिल्डवर उतरले

सोमवारी रात्री धाराशीवरचे खासदार ओमराजे निंबाळकर हे परांडा तालुक्यात वडनेर इथे अतिवृष्टीची पाहणी करण्यासाठी गेले होते. तेव्हा एक आजी आणि दोन वर्षांचा मुलगा पाण्यात अडकल्याचं त्यांना दिसलं. तेव्हा ओमराजे स्वतः पाण्यात उतरले आणि त्यांनी या आजी-नातवाला सुखरूप बाहेर काढण्यास मदत केली.२०१६ साली जिथं रेल्वेनं पाणी पुरवावं लागलं होतं, तो लातूर जिल्हा आज पूरस्थितीशी दोन हात करत आहे. काँग्रेस आमदार अमित देशमुख यांनीही शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी केली. तातडीनं पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी देशमुख यांनी केली आहे.

सिल्लोडचे शिवसेना आमदार अब्दुल सत्तार यांनीही आपल्या मतदारसंघात पूरग्रस्तांच्या व्यथा जाणून घेत त्यांना उपयोगी साहित्याचं वाटप केलं.उत्तर महाराष्ट्राच्या काही भागात पुरानं मोठं नुकसान केलं आहे. त्यामुळे शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटीलही मैदानात उरलेले दिसले. त्यांनी जळगावच्या पाचोऱ्या तालुक्यात अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी केली.बीडमधल्या आष्टीचे भाजप आमदार सुरेश धस यांनीही पाटोदा, भाकरेवस्ती, पारगाव आणि मांजरा नदीकाठच्या अन्य पूरग्रस्त गावांना भेटी दिल्या. तसेच त्यांनी प्रशासनाची बैठक घेऊन मदतकार्याचा आढावाही घेतला.

## आम्ही पाहणीपूर्वीच

मदतीसाठी सरकार त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले. तसेच, विरोधकांकडून होत असलेल्या मागणीवरुन आणि टिकेवरुन पलटवारही केला. शेतकऱ्यांसाठी जेवढं करता येईल ते आम्ही करत आहोत आणि पुढेही करू, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केल्यानंतर देवेंद्र फडणवीस हे लातूर जिल्हा दौऱ्यावर असून येथील निलंग्यातील शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी केल्यानंतर त्यांनी संवाद साधत शेतकऱ्यांना धीर दिला.

लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. यावेळी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले व माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. घाबरू नका, सरकार तुमच्या पाठीशी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले, विरोधकांनी कधीही भरपाई दिली नाही. हे पहिले सरकार आहे, ज्यांनी पाहणीपूर्वीच २२०० कोटी रुपये शेतकऱ्यांच्या मदतीसाठी रिलीज केले आहेत. शेतकऱ्यांच्या दु:खात राजकारण करणे योग्य नाही. कधीतरी विरोधकांनी आरशात पाहावे, त्यांच्या काळात आपत्ती आली तेव्हा त्यांनी काय केले होते? असा टोलाही फडणवीसांनी लगावला. तर, शेतकऱ्यांसाठी जेवढं करता येईल ते आम्ही करत आहोत आणि पुढेही करू, असे आश्वासनही त्यांनी दिले. दरम्यान, राज्यातील अनेक जिल्ह्यात आठवडाभरापासून सुरू असलेल्या पावसामुळे अनेक जिल्ह्यात मोठं नुकासान झालं आहे. मराठवाड्यातही मोठ्या प्रमाणात वित्तहानी झालेली आहे, सोबतच जीवितहानीही झाली आहे.

मराठवाड्यात २३ लाख ४१४ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

गेल्या दोन दिवसातील पावसानंतर हा आकडा २५ लाख हेक्टर पेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात १२३९ गाव बाधित झाली आहेत. २ लाख ६१ हजार ७०९ शेतकऱ्यांची शेती पाण्याखाली गेली आहे. २२ लाख ९ हजार ४ हेक्टर जिरायत पिकांचे नुकसान झालंय. १०२३ हेक्टर वरील बागायत तर ३८७ हेक्टर वरील फळपीक वाया गेले आहे. विभागीयुक्त कार्यालयांना तसा अहवाल शासनाकडे पाठवला आहे. सर्वाधिक नुकसान धाराशिव जिल्ह्यात झाले असून ६ लाख २९ हजार ८९० हेक्टर पिकांचे नुकसान झाले.

जीवितहानी आणि वित्तहानी

मराठवाड्यात एकूण १० जणांचा मृत्यू झाला.त्यातील ४ जणांचा शोध सुरू आहे. त्यात जिल्ह्यातील लातूर २, धाराशिव ३, बीडमधील ३ तर नांदेडमध्ये १ जणांचा मृत्यू झाला आहे. मराठवाड्यात एकूण लहान-मोठी ३३७ जनावरे दगावली. त्यात संभाजीनगर जिल्ह्यात ५, जालना २३, परभणी जिल्हात २४, हिंगोलीमध्ये ६, नांदेड जिल्ह्यात ९, बीड जिल्ह्यात ६३, लातूर जिल्ह्यामध्ये ७, धाराशिव जिल्ह्यातील २०० जनावरांचा समावेश आहे.

## बॅगवरचा फोटो

आर्थिक मदत मंजूर केली आहे. यापैकी १ हजार ८२९ कोटी रुपये जिल्हास्तरावर वितरित करण्यात आले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्री पूरग्रस्त भागाला भेटी देण्याबाबत बैठकीत ठरवण्यात आले. यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी पूरग्रस्त ठिकाणी जाऊन पाहणी केली.

धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या करंजा गावातील शिंदे व करळे वस्तीतील शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन तेथील परिस्थिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाणून घेतली. मुसळधार पावसामुळे सीना नदीला पूर आल्याने स्थानिक वाड्या वस्त्यांचे अतोनात नुकसान झाले असून, अनेक घरे माती चिखलाने भरून गेली आहेत. तसेच शेतीचे संपूर्ण नुकसान झाले असून शेतातील मातीदेखील वाहून गेली आहे. आज येथील ग्रामस्थांची व्यथा जाणून घेतली तसेच शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे सांगून त्यांना आश्वस्त केले.

एक किलो धान्य कधी शेतकऱ्याच्या बांधावर नेऊन दिले का?

शिवसेनेच्या वतीने दिल्या जात असलेल्या मदतीच्या किटवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा फोटो लावण्यात आला आहे. यावरून विरोधकांकडून टीका केली जात आहे. ज्यांनी आरोप केले, त्यांनी एक किलो धान्य कधी शेतकऱ्याच्या बांधावर नेऊन दिलय का? कार्यकर्त्यांने त्या ठिकाणी मदत वाटप केले, तर त्या बॅगेत काय मदत साहित्य आहे, यावर लक्ष द्या. जे फोटोवर लक्ष देतात त्यांना राजकारण करायचे आहे, असे उत्तर देण्यात आले.

शेतकऱ्याच्या मागे उभे राहणे हे सरकारचे काम

शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. घरात पाणी शिरल्यामुळे जीवनावश्यक वस्तूच नुकसान झाले आहे. म्हणून आता नदीकाठी जी गाव आहेत, गावातील जमिनी खरडून गेल्या आहेत. एकंदरीत प्रचंड मोठे नुकसान झालं आहे. ९८ हजार हेक्टर शेतीच नुकसान झालेले आहे. हे अस्मानी संकट आहे. शेतकऱ्याच्या मागे उभे राहणे हे सरकारचे काम आहे. सरकार यापूर्वी शेतकऱ्याच्या मागे उभ राहिले,आजही उभे आहे. तातडीची मदत तात्काळ देऊ. नंतर पंचनामे करुन जी मदत ठरवली ती देऊ. कारण नुकसान मोठे आहे, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

सरकारी निकष बाजूला ठेवून त्यांना भरीव मदत करावी लागेल

नदी पात्रात असलेल्या वाडीतील काही घरे अद्यापही पाण्याखाली असल्याचे काही ग्रामस्थांनी माझ्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर तात्काळ बोटीने नदीपात्रात जाऊन या वाडीला भेट देऊन पाहणी केली. या वाडीवरील नागरिकांचे तात्काळ पुनर्वसन करण्यासाठी प्रस्ताव पाठवण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना एकनाथ शिंदे यांनी दिले. तसेच या सीना नदीवर पूल उभारण्याची ग्रामस्थांची मागणी देखील मान्य केली जाईल असे याप्रसंगी सांगितले. शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची भरपाई देताना सरकारी निकष बाजूला ठेवून त्यांना भरीव मदत करावी लागेल, असे माझ्या निदर्शनास आले. शासन त्यासाठी नक्की प्रयत्न करेल. तसेच शिवसेनेच्या वतीने त्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

## ४० जणांकडून

विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जाणारे केरवाडी पालम येथील रहिवासी पवन करवर यांच्यावर मंगळवारी रात्री सावरगाव परिसरात प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात पवन करवर हे गंभीर जखमी झाले असून त्यांचे इतर तीन साथीदार किरकोळ जखमी झाले आहेत. विशेष म्हणजे गेवराई तालुक्यात काही आठवड्यांपूर्वी जेव्हा लक्ष्मण हाके यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला होता तेव्हा पवन करवर हे हाके यांना वाचवण्याचा प्रयत्न करत होते. याच करवर यांच्यावर हल्ला झाल्याने हाके यांनी संताप व्यक्त केला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, पवन करवर आणि त्यांचे साथीदार मंगळवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास सावरगावजवळील एका धाब्यावर जेवणासाठी थांबले होते. दरम्यान, अचानकपणे ४० ते ५० अज्ञात युवक धाब्यावर पोहोचले आणि हातातील काठ्या, दांडके तसेच लाथाबुक्क्यांच्या सहाय्याने करवर यांच्यासह चौघांना मारहाण सुरू केली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे काही क्षण धाबा परिसरात एकच गोंधळ उडाला.टोळक्याने केलेल्या हल्ल्यात पवन करवर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यांना तातडीने माजलगाव येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या तिघा साथीदारांनाही मार लागला असून त्यांच्यावरही उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बालक कोळी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी जखमींना उपचारासाठी हलवले असून, हल्ला करणारे सर्वजण घटनास्थळावरून पसार झाले आहेत.दरम्यान, या घटनेमुळे माजलगावमध्ये भीतीचे व वातावरण निर्माण झालं असून या घटनेची सर्वत्र चर्चा होत आहे. नेमका हा हल्ला पूर्वनियोजित होता की किरकोळ वादातून झाला याबाबत अजूनही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. मात्र ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांचे विश्वासू कार्यकर्त्यावर करण्यात आलेल्या या हल्ल्यामुळे राजकीय वर्तुळातही चांगलीच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## काँग्रेस नेत्याला साडी

घालवली, एक डागही लावून घेतला नाही. आज हा माझा अपमान नाही. त्यांनी मला जी जातीवाचक शिवीगाळ केली तो सर्व बहुजन समाज आहे त्याचा तो अपमान आहे. भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये हिंमत नव्हते म्हणून त्यांनी फसवूण बोलावले. अन्यथा मला चॅलेंज करायचे होते मी पण काँग्रेसचे पदाधिकारी घेईन आलो असतो आणि तुम्हाला काँग्रेसची ताकद दाखवली असती.'

भाजपचे कल्याण जिल्हाध्यक्ष नंदकिशोर परब यांनी मामा पगारे यांना साडी नेसवण्याच्या कृतीचे समर्थन केले आहे. ते म्हणाले, पगारे यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी पोस्ट ही निंदनीय होती. त्यांनी ज्या पद्धतीने फोटो व्हायरल केला त्याच पद्धतीने त्यांचा आम्ही सत्कार केला. आम्ही पोलिसांना देखील निवेदन देत पंतप्रधान मोदी यांची बदनामी करणाऱ्याच्या विरोधात योग्य ती कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

## सरपंच पुत्राचा

सरपंचांचा मुलगा मोनू चंद्रकांत राख (वय २६) याचा जागीच मृत्यू झाला. तर विजय सानप (२९) आणि संघर्ष बांगर (२६) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत.

धडकेची भीषणता इतकी होती की कारचा चक्काचूर झाला, तर बस रस्त्याखाली जाऊन थांबली. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. गंभीर जखमी विजय सानप आणि संघर्ष बांगर या दोघांना तातडीने बीड शहरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. डॉक्टरांच्या माहितीनुसार त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## छत्रपती शिवाजी

आहे. प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाजूला खुनी नथुराम गोडसेचा फोटो छापणे अत्यंत शरमेची बाब असल्याची चौफेर होऊ लागली आहे.एसटी बँकेवर ड. गुणरत्न सदावर्ते यांचे पॅनेल निवडून आल्यापासून सातत्याने वाद निर्माण होत आहेत. सहकार खात्याने आणि रिझर्व्ह बँकेने संचालक मंडळ आणि कार्यशैलीवर ताशेरे ओढले आहेत. त्यातून आता एक नवा वाद सुरू झाला. या अहवालात छापलेल्या फोटोमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांच्यासह ड. गुणरत्न सदावर्ते आणि त्यांचा पत्नी आदींचे फोटो आहेत.एसटी बँकेने तयार केलेल्या एटीएम कार्डवर कमळाचे चिन्ह छापण्यात आले आहे. या संपूर्ण अहवाल पुस्तिकेत एकूण १५ फोटोंमध्ये गुणरत्न सदावर्ते आहेत. काही फोटोंमध्ये पत्नी, मुलीचाही समावेश आहे.एसटी कामगार सेनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी ॲड. गुणरत्न सदावर्तेसारख्या विकृत माणसाकडून दुसरी अजून अपेक्षा तरी काय? आमच्या राजाच्या आणि प्रभू रामचंद्रांसोबत एका खुन्याचा फोटो लावणे कितपत योग्य आहे? शहाजी पाटील समितीने बँकेचा कोट्यवधींचा घोटाळा उघड करूनही या व्यक्तीवर कारवाई होत नाही, हे दुर्दैव आहे, अशी टिका केली.एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाजूला खुनी नथुराम गोडसेचा फोटो छापणे लांच्छनास्पद आहे. शिवाजी महाराज हे सर्वश्रेष्ठ राजे होते. त्यांच्या बाजूला नथुरामला बसवणे हा किळसवाणा प्रकार आहे. बँकेत केलेले घोटाळे लपवण्यासाठी राज्य सरकारमधील प्रभावी नेत्यांसोबत फोटो छापण्यात आले आहेत, असा टोला लगावला.

## पिंपळनेरमध्ये लघुउद्योग बद करण्यासाठी व्यापाऱ्यावर हल्ला

पिंपळनेर, (दिव्य न्युज):- गावातील दुकानात झोपलेल्या व्यापाऱ्यावर अज्ञात आरोपींनी लोखंडी गजाने जीवघेणा हल्ला करून गंभीर जखमी केले. ही घटना १९ सप्टेंबर २०२५ रोजी पहाटे १.३० ते २.०० वाजताच्या सुमारास घडली.

फिर्यादी शांता कमलाकर काटे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे पती सखाराम विठ्ठल काटे हे आपल्या लघुउद्योगाच्या (मुरकूल, शेंगदाणे, फुटाणे विक्री) दुकानात झोपलेले असताना आरोपींनी संगनमत करून दुकानाचे शटर बाहेरून उघडले.

त्यानंतर हातातील लोखंडी गजाने डोक्यात, डोळ्यांवर आणि तोंडावर मारहाण करून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला. हल्लेखोरांनी तुझा लघुउद्योग व्यवसाय बंद का करत नाहीस? असे म्हणत हल्ला केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या हल्ल्यात सखाराम काटे गंभीर जखमी झाले.या प्रकरणी गु.र.नं. २७२/२०२५ अंतर्गत कलम १०९, ३३३, ३५१(२), ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास उपनिरीक्षक गर्जे करीत आहेत.